*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

---

प्रसिध्दी : परिवर्तनाचा वाटसरू ,दिवाळी अंक 2009

# माध्यमांचे नीतिशास्त्र : स्वरुप व गरज

श्रीनिवास हेमाडे
9226563052
madshri@hotmail.com

1

गेल्या दोन दशकांदरम्यान जगाचे, पर्यायाने जगण्याचे चित्र फारच बदलले.प्रगत राष्ट्रांपुरतेच मर्यादित असलेले उदारीकरण सर्व जगाचे उदारीकरण बनले. त्याचेच मोहक नाव आहे जागतिकीकरण.विज्ञान आणि तंत्रज्ञान उपलब्ध होतेच. पण संपर्कसाधनांनी खरीच क्रांती घडविली.मोबाईलमुळे किमान संपर्कमाध्यमक्षेत्रात तरी समता प्रस्थापित केली. वर्णजातीलिंगभेद, आर्थिक - सामाजिक - राजकीय इ.इ. भेद संपवून हे खेळणे सर्वाच्या हाती आले.परिणामी' शहराकडून खेड्याकडे आणि खेड्याकडून शहराकडे ' हे काही दशके चाललेले युध्द उदारीकरणाने संपविले.जगाचेच खेडे बनविले. जगाचे ग्लोबल व्हिलेज बनले.एक वासाहतिक अद्‌वैतवाद प्रस्थापित झाला !! आता नुकतीच विद्यमान मा. मुख्यमंत्री अशोकरावजी चव्हाण यांनी महाराष्ट्राला ' ग्लोबल स्टेट ' बनविण्याची घोषणा केलीय ! असे झालेच ते नवलच म्हणावे की काय ? अशी शंका येते.

जगात जे काही घडते ते इतरांना सांगणारी यंत्रणा म्हणजे माध्यमे.जागतिकीकरणाचे तीव्र पडसाद माध्यमांवरही उमटले.त्यांचे स्वरुपच बदलले.साहजिकच कार्यपध्दती बदलली.मग नवे प्रश्न निर्माण झाले.तेही उग्र झाले.माध्यमविषयक प्रश्न हे नेहमीच सामाजिक प्रश्न असतात.पण हे प्रश्न तंत्रज्ञान विषयक नाहीत, तर नैतिक स्वरुपाचे आहेत.ते जास्त गंभीर आहेत.

परिणामी माध्यमांशी संबंधित असलेल्या नैतिक समस्यांची चर्चा अनिवार्य ठरते. वृत्तपत्रे , चित्रपट, दूरदर्शन, रेडिओ ही पारंपरिक माध्यमे आहेत. जागतिकीकरणाने महाजाल (इंटरनेट) या नव्या माध्यमाला जन्म दिला.अशा रितीने माध्यमांची संख्या पाचावर गेली. आता ब्लॉग्ज हे सुध्दा नवे माध्यम विकसित झाले आहे. विविध वाहिन्या व (काही प्रगत देशातील ) खासगी मालकीची रेडिओ स्टेशन्स ही सुध्दा माध्यमेच आहेत. माध्यम म्हणजे संभाषणाचा किंवा सुसंवाद करण्याचा मार्ग होय.तो इंग्लीशमधील medium चे भाषांतर आहे . Media हे त्याचे अनेकवचन होय.माध्यम म्हणजे संभाषणाचा,संप्रेषणाचा,संवादाचा मार्ग किंवा साधन होय.सम् भाषण म्हणजे संभाषण.संवाद म्हणजे *सम् वाद*. संप्रेषण म्हणजे *सम् प्रेषण*. सम् म्हणजे एकसारखे,एकाच पातळीवर किंवा स्तरावर येवून (काहीएक कृती करणे होय.)

माध्यमात काम करणारे ते माध्यमकर्मी. माध्यमात विविध पातळ्यांवर विविध प्रकारचे लोक असतात. प्रत्येक माध्यमाचे स्वरुप, कार्य आणि रचना एक दुसरीपासून भिन्न असते.पण माध्यम म्हणून त्यांची मार्गदर्शक तत्वे समान असतात.त्यानुसार त्यांनी काम करावे, अशी अपेक्षा असते.पण तसे घडतेच, असे नाही.

निवडणुका हा घोडेबाजार झाल्याचे तत्वत: आणि व्यवहारत: मान्य झाल्याने सारा लोकव्यवहारच संशयास्पद बनला आहे.त्यामुळे चौथ्या खांबांवरील जबाबदारी वाढलेली आहे आणि ती त्याने निरपेक्षरित्या पार पाडावी,अशी अपेक्षा व्यक्त केली जाते. यात गैर काही नाही.पण हा चौथा खांबही आतून पोखरत चालला आहे. हे ही वास्तव आहे.हे सत्य स्वीकारुन काय करता येईल, हा मुद्‌दा महत्वाचा बनला पाहिजे.त्यासाठी काही मूलभूत संकल्पना स्पष्ट केल्या पाहिजेत.

## बातमीदार व पत्रकार यातील फरक

माध्याच्या प्रतिनिधीला पत्रकार म्हणण्याची (पवित्र) पध्दत आहे.तथापि बातमीदार व पत्रकार या संज्ञामध्ये फरक आहे.एखादे वृत्तपत्र केवळ जनहित या निकषावर जो सुरु करतो;तसेच ज्याला काहीएक तात्विक भूमिका असते त्यालाच 'पत्रकार' म्हणता येते. तर जो अशा वृत्तपत्रांना केवळ बातम्या देतो त्याला 'बातमीदार' म्हणावयाचे असते.शहरात आणि

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

---

गावोगावी असणारे पत्रकार हे खरे तर ‘पत्रकार ’ नसतातच , ते ‘बातमीदार’ असतात !

माध्यम कोणतेही असले तरी त्यात वृत्तसंकलन,संपादन, निर्मिती आणि वितरण इत्यादी मोठी आणि व्यापक प्रक्रिया असते.वेगळ्या भाषेत वृत्तसंपादन आणि व्यवस्थापन असे दोन विभाग असतात.त्यातील संपादन करणारा तो संपादक होय.संपादकच खरा पत्रकार असतो.वृत्तपत्राची मालकी त्याच्याकडे असल्याने मालक हाच पत्रकार / संपादक असतो.

जागतिकीकरण,खुली बाजारपेठ इत्यादीमुळे गेल्या दशकात या रचनेत मूलभूत फरक पडला असून हल्ली माध्यमांना शुध्द व्यावसायिक स्वरुप आले आहे.साहजिकच संचालक संपादक अथवा संपादक संचालक इत्यादी नव्या जागा निर्माण झाल्या असून उरलेली रचना त्यानुसार बनत गेली आहे.प्रेस रेग्युलेशन ब्युरोने यासंबंधात बरीच नवी नियमावली आणली आहे.

2

## धंदा आणि व्यवसाय यातील सीमारेषा

तथापि धंदा आणि व्यवसाय यातील सीमारेषा माध्यम उद्योगाने सुस्पष्टपणे लक्षात न घेतल्याने बरेच पेचप्रसंग या उद्योगात निर्माण झाले आहेत.विशेषत: वृत्तपत्रे आणि वाहिन्यांनी उद्योगसमूहांचे (Corporate sector) स्वरुप धारण केल्यापासून पत्रकारीतेची उद्दिष्टे व कार्यप्रणाली याबाबत भयानक संकल्पनात्मक गोंधळ निर्माण झाला आहे. या उद्योगसमूहाने धंदे नीतीशास्त्र (Business Ethics) आणि व्यावसायिक नीतीशास्त्र (Professional Ethics) यातही बराच गोंधळ केला आहे.खरे तर उद्योगसमूहाचे नीतिशास्त्र (Corporate Ethics) ही बाब पुन्हा वेगळीच आहे.

माध्यमांचे विविध प्रकार

आधी स्पष्ट केल्याप्रमाणे माध्यमाचे एकूण पाच प्रकार आहेत.ती म्हणजे वृत्तपत्रे, चित्रपट, रेडिओ, दूरदर्शन आणि इंटरनेट. यातील वृत्तपत्रे, चित्रपट व इंटरनेट ही पूर्णपणे खासगी असून ती व्यक्तिच्या अथवा कुटुंबाच्या किंवा उद्योगसमूहाच्या मालकीची असतात किंवा असू शकतात.रेडिओ आणि दूरदर्शन ही सरकारी मालकीची असतात. त्यातही गेल्या काही वर्षांपासून दूरदर्शनला स्पर्धा म्हणून विविध वाहिन्या सुरु झाल्या असून जागतिकीकरणामुळे त्यांचे आगमन अपरिहार्य झाले आहे.Etv वाहिनी तर पूर्णपणे खासगी व्यक्तिच्या मालकीची आहे.

वृत्तपत्रे पूर्वीपासूनच खासगी व्यक्तिच्या मालकीची, विश्वस्त निधीची अथवा एखाद्या विचारप्रणालीला वाहिलेल्या लोकांच्या नियंत्रणाखालील गटाची आहेत.अर्थात रशिया,चीन,पाकिस्तान सारख्या देशात वृत्तपत्रेही सरकारी असतात.पण ती विश्वासार्ह असतातच असे नाही.भारतातही ’ समाचार दर्शन ’ सारखे वृत्तपत्र सरकारी आहे. गेल्या काही वर्षांमध्ये राजकारण्यानींही वृत्तपत्रे विकत घेवून मालकीची केली आहेत. अर्थातच त्यामध्ये त्यांच्या विरोधातील कोणतेही लेखन येवू शकत नाही.

## माध्यमांशी संबंधित नैतिक समस्या

‘माध्यमांशी संबंधित नैतिक समस्या’ हीच एक समस्या असून ती गेल्या दशकापासून तीव्र झाली आहे. केवळ भारतातच नव्हे तर ती जागतिक समस्या बनली आहे. वृत्तपत्रे ही समाजासाठी काम करणारी असतात, ती सामाजिक हितसंबंधीशीच बांधलेली असतात, असा एक समज होता. तथापि जागतिकीकरणाने जे काही नवे प्रश्न निर्माण केले त्यात ’ माध्यमांशी संबंधित नैतिक समस्याही ’ उपस्थित झाल्या.

या समस्या मुख्यत: ज्यांना सर्वसामान्य जनता ‘पत्रकार’ या नावाने ओळखते त्यांच्या प्रामाणिकपणाशी संबंधित आहेत. त्याचबरोबर वृत्तसंकलनातील व मांडणीतील स्वातंत्र्य, वस्तुनिष्ठता, खासगीपणा याही अनुषंगिक समस्या आहेत.भ्रष्टाचार न करता प्रामाणिक राहून केवळ लोकहिताची कामे करणे म्हणजे वस्तुस्थितीप्रमाणे सत्यच बातम्या देणे, वृत्तपत्रांचे व पत्रकारितेचे स्वातंत्र्य जपणे, बातम्या देताना कोणत्याही व्यक्ति अथवा लालूच, धमकी यांच्या दबावाखाली न येता वस्तुनिष्ठतेने (जशा आहेत तशा) बातम्या देणे , बातमी देताना संबंधित व्यक्तिची बदनामी होणार नाही, अशा तऱ्हेने तिचे खासगीपण जपणे इत्यादी खबरदारी पत्रकारास घ्यावी लागते.विशेषत: बलात्कार,विविध प्रकारचा भ्रष्टाचार, उच्चपदस्थ किंवा लोकसेवक, समाजसेवक यांच्याबाबतीत बातम्या देताना पत्रकारास त्यांचे खासगीपण सांभाळावे लागते

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

---

थोडक्यात स्वातंत्र्य,वस्तुनिष्ठता,प्रामाणिकपणा व खासगीपणा या माध्यमाशी संबंधित मुख्य नैतिक समस्या आहेत.त्यांनाच 'माध्यमांशी संबंधित नैतिक मूल्ये' असेही म्हणता येईल .ही मूल्ये पत्रकारांनी आचरणात आणावयाची असतात.गेल्या दशकात हे सारे प्रश्न ऐरणीवर आल्याने प्रत्येक माध्यमाने आपआपली स्वतंत्र आचारसंहिता तयार केली आणि ती जनतेसाठी प्रसिध्दही करण्याची पध्दती सुरु केली. या पूर्वी असे कधीही घडले नव्हते.तथापि जीवनाचे स्वरुप जितके विशेषीकरणाची पात्रता विकसित करते तितकी आणि त्याप्रमाणात नैतिक गुंतागुंत तयार होते.या नियमानुसार माध्यमांचे स्वरुप जसे विकसित होत गेले तशी त्यांच्या आचारसंहितांमध्येही अतिकाटेकोरपणाही आला.

या बाबीस आणखी एका परिमाणाची झालर आहे. न्यायव्यवस्था आणि माध्यमे यांचे संबंध भारतात आणि जगातच सर्वत्र तणावाचे झाले आहेत.न्यायदानाची न्याययंत्रणेची भूमिका माध्यमांनी हाती घेतल्याचे चित्र निर्माण झाल्याने या दोन व्यवस्थांमध्ये चमत्कारीक तणाव निर्माण झाला आहे.त्यास न्यायव्यवस्थेचे स्वरुप आणि दिरंगाईची कार्यपध्दती हे एक महत्वाचे कारण ठरली आहेच.पण वकीली व्यवसाय नफेखोरी धंद्यात रुपांतरीत झाल्याने एकूण न्यायव्यवस्थेच्या सचोटीपणाबद्दल साधार संशय वयक्त केला जात आहे.

माध्यम निर्मिती ही एक प्रचंड भांडवली गुंतवणूक ठरल्यामुळे पत्रकारीता आणि न्यायव्यवस्था यांच्यात संघर्ष होत आहे.कारण भांडवलदार, राजकारण आणि संसद यांचा जवळचा संबंध आहे.न्याययंत्रणा संसदेच्या अधिपत्याखाली येते.ही यंत्रणा कायदापालनासाठी कायदा निर्मितीसाठी नाही.ते काम संसदेचे आहे.पण या सगळ्या घटकांचे परस्परांमधील व्यापक हितसंबंध लक्षात घेता माध्यमांपुढे नैतिक पेचप्रसंग निर्माण होताना दिसत आहेत.त्याचाही परिणाम माध्यमनीतीशी आहे.माध्यम नीतीशास्त्र उदयास येण्याचे ते महत्वाचे कारण आहे.

## माध्यमांच्या नीतीशास्त्राची गरज

गेल्या काही वर्षामध्ये माध्यमकर्मी किंवा ज्यांना पत्रकार म्हंटले जाते त्यांच्या प्रामाणिकपणा व वस्तुनिष्ठतेविषयी निर्माण झालेले प्रश्न केवळ भारतातील पत्रकारितेविषयीच नव्हे तर जगातील पत्रकार , माध्यमे व पत्रकारिता यांच्यापर्यंत जावून पोहोचणारे आहेत. मुळात पत्रकारिता ही पुर्णपणे खासगी नोकरी व खासगी क्षेत्र असल्याने तिचे नितीनियमही खासगी मालक वर्गच निश्चित करु लागला. पण पत्रकारितेचे स्वरुप काहीसे चमत्कारीक आहे.

पत्रकारिता ही खासगी असली तरी तिचा चिंतनविषय मात्र सामाजिकच असतो. मुख्यत: शासन व जनता यांच्यातील हितसंबधाचे चित्रण पत्रकारिता करीत असते.पण ज्या ज्या वेळी या हितसंबधांना धोका पोहचतो त्या त्या वेळी पत्रकारितेस त्यांच्यावर कडक नियंत्रण ठेवण्याचे काम करावे लागते. उदाहरणार्थ अमेरिकेने जेंव्हा इराकवर स्वारी केली व सद्दाम हुसेनची राजवट संपुष्टात आणली तेंव्हा अमेरिकेने इराकवर अणुबॉम्ब तयार केल्याचा आरोप केला. त्यास तेथील पत्रकारांनी पुष्टी दिली. मात्र काहीजणांनी हा दावाच खोटा असल्याचे सिध्द केले. त्याचप्रमाणे अमेरिकेने व्हिएतनामवर युध्द लादले तेंव्हासुध्दा माध्यमांनी चुकीच्या बातम्या दिल्या. एवढेच नव्हे तर माजी पंतप्रधान बाजपायी यांच्या सभेत साड्या वाटण्यावरुन झालेल्या गोंधळात 25 महिला चेंगराचेंगरीत ठार झाल्या तेंव्हाही येथील माध्यमांनी चुकीच्या बातम्या दिल्या किंवा मग त्या बातमीला एकतर महत्वच दिले नाही किंवा मग वगळूनच टाकली ! अथवा गोध्रा हत्याकांड प्रकारणी अनेक प्रकारच्या उलटसुलट बातम्या येत गेल्या.

हे असे घडते, कारण माध्यमे अनेक आहेत आणि त्यात काम करणारे पत्रकार,संपादक , मालक अनेक आहेत, त्यांच्या विचारसरण्या अनेक आहेत, त्या विचारांमध्ये प्रचंड फरक आहे. त्यामुळे कायदा जसा सर्वांना समान असतो,तसा या माध्यमांना समानरितीने लागू होईल, असा नैतिक कायदा नाही. नैतिक नियम सापेक्ष असल्याचा फायदा हे माध्यमक्षेत्र नेहमीच घेत आल्याने त्या सर्वांना समान पध्दतीने लागू होईल, असा नीतीनियम करण्यासाठी माध्यमांच्या नीतीशास्त्राची गरज आहे. तेच त्याचे महत्व आहे.कारण नैतिक नियमांच्याबाबतीत या क्षेत्रातील तज्ञांमध्ये गोंधळ आहे. हा गोंधळ दूर करुन त्यांच्या वर्तनविषयक जाणिवांमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी अशा नीतीशास्त्राची गरज आहे.

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

---

## लोकशाही आणि माध्यमे - परस्पर संबंध : पत्रकारिता - लोकशाहीचा चौथा स्तंभ

खुली व वस्तुनिष्ठ पत्रकारिता ही नेहमी लोकशाहीतच शक्य असते. लष्करशाही, हूकूमशाही , राजेशाही , अध्यक्षशाही किंवा तत्सम जीवनशैलीत खरी पत्रकारिता उदयास येवूच शकत नाही. उदाहरणार्थ समाजवाद प्रभावी असताना रशियन साम्राज्यातील कोणत्याही राष्ट्रांत ती येवू शकली नाही. जी काही पत्रकारिता होती ती पूर्णपणे सरकारी नियंत्रणाखालीच होती. त्यामुळे समाजवादाला व सरकारला धोका होईल, अशा कोणत्याही बातम्या जगाला कधीही कळू शकल्या नाही. या उलट अमेरिका हा कितीही जुलुमशाहीवादी (उघड किंवा छुपे) राष्ट्र असले तरीही तिथे लोकशाही असल्याने तेथील माध्यमे व पत्रकार अतिशय मुक्त,स्वतंत्र होते. त्यामुळे माध्यमांची मालकी बहुधा भांडवलदारांच्या हातात असून ही तेथील पत्रकार सरकारविरोधी जनहिताच्या बातम्या प्रसृत करु शकले.लोकशाही हीच किमान पातळीवर सामाजिक दुरिते असणारी जीवनपध्दती आहे. त्यामुळे ती कितीही दोषपूर्ण असली तरीही सर्वसामान्यांना मतस्वातंत्र्य व अभिव्यक्ति स्वातंत्र्य देणारी तीच योग्य राज्यपध्दती असते.

लोकशाहीचे मुख्य चार स्तंभ असतात .त्या स्तंभांवरच लोकशाही आधारलेली असते:

(1)विधीमंडळ (शासनाची कायदे करणारी संस्था - संसद (Rule making body )

(2)कायदे मंडळ (कायद्याची अमलबजावणी करणारी संस्था (Rule Application body)

(3)न्यायमंडळ : (प्रत्यक्ष न्यायदान करणारी संस्था (Rule Adjudication body)

(4) माध्यमे (Media) पत्रकारिता (Press)

लोकशाही शासन जरी लोकबळावरच निवडून येवून लोकहिताची कामे करीत असले तरी ते विविध कारणांमुळे भ्रष्ट होत असते. भ्रष्टाचार हे लोकशाहीतील एक अपरिहार्य दुरित आहे. पण लोकशाहीने अधिक भ्रष्ट होवू नये,त्याने किमान प्रमाणात तरी लोकहिताची कामे केलीच पाहिजेत, यासाठी कोणत्यातरी नियंत्रक घटकाची आवश्यकता असते. ते काम पत्रकारिता किंवा माध्यमे करीत असतात. शासन, शासनाधिकारी किंवा लोकप्रतिनिधी ज्यावेळी बेताल, बेफाम व भ्रष्ट वर्तन करतील त्यावेळी पत्रकारिताच त्यांचे हे वर्तन उघडकीस आणून त्यांना खऱ्या ''लोकन्यालयात'' आणू शकते.निवडणुकीत हे लोकन्यालय अशा भ्रष्टाचाऱ्यांना इंगा दाखवू शकते.भ्रष्टाचार संपूर्णपणे नष्ट झाला नाही तरी तो कमीत कमी पातळीवर राहतो. लोकांना काही प्रमाणात का होईना न्याय मिळू शकतो. त्यामुळे लोकशाही टिकून राहते.हे माध्यमांमुळे घडते.म्हणूनच तर पत्रकारितेला 'लोकशाहीचा चौथा स्तंभ ' असे म्हटंले आहे.

सत्यशोधन,प्रामाणिकपणा, वस्तुनिष्ठता व खासगीपणा ही नैतिक मूल्ये नेहमी लोकशाही जीवनपध्दतीतच शक्य होणारी मूल्ये आहेत. माध्यमे आणि लोकशाही यांचा संबंध याच संदर्भात प्रामुख्याने येतो.

## माध्यमांचे स्वरुप व माध्यमांची भूमिका

पाच प्रकारच्या माध्यमांशी संबंधित नैतिक समस्या मुख्यत: चार प्रकारच्या आहेत. आता,त्यात इलेक्ट्रॉनिक माध्यमांनी म्हणजे वृत्तवाहिन्यांनी बराच धुमाकूळ आपल्या दैंनदिन जीवनात माजविला आहे. चोवीस सतत नवनवीन बातम्या देण्यात या वाहिन्या गुंतल्या असल्याने त्यांना सतत प्रेक्षकांना गुंतवित ठेवण्याचे काम करावे लागते आहे.त्यामुळे माध्यमांची आपल्याबाबत व आपलीही माध्यमांबाबत भूमिका ठरविण्याची जबाबदारी येते. ही पुढीलप्रमाणे :

**(1) सामान्य जनतेने माध्यमांकडे कसे पाहावे ?**

आपल्या रोजच्या जीवनात माध्यमांकडे कसे पाहावे ? त्याकडे किती लक्ष द्यावे ? तर ,-

अ) आपले आधुनिक समजले जाणारे जीवन जनसंपर्काच्या माध्यमांशिवाय जगणे कठिण आहे.

ब) माध्यमांच्या प्रभावाखाली आपला बराच वेळ जातो. म्हणजे आपण विविध वाहिन्या, वृत्तपत्रे, चित्रपट इत्यादी मध्ये जे कथित केले गेलेले आहे, त्यावर जणू अंधविश्वास ठेवतो.

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

---

क) बातमीचा विषय असलेली प्रत्यक्ष घटना घडते तेंव्हा प्रेक्षक दूर असला तरी तिचा सर्व जातीधर्माच्या सर्व स्तरातील सर्व प्रेक्षक स्त्रीपुरुषांवर परिणाम होतो.

**(2) सामाजिक संवादाचा लोप**

याचाच अर्थ असा की आज आपण ज्या संस्कृतीत म्हणजे ज्या जीवनपध्दतीत जगतो आहोत त्या व्यक्तिंमध्ये थेट परस्पर संप्रेषण(संवाद) होण्याऐवजी त्यांच्यातील संवाद हा जनसंपर्काच्या माध्यमांच्या मार्फत होतो आहे. म्हणजेच व्यक्तिव्यक्तिंमधील संवादच तुटतो आहे.याचा अर्थच असा की या संवादावर माध्यमे नियंत्रण आणतात !

**(3) स्वातंत्र्याचा अभाव**

5

माध्यमांमुळे व्यक्ति व समाज यांच्यातील स्वातंत्र्य नाहीसे होवून त्यांच्यात माध्यमांवर अवलंबून राहण्याची व त्यांच्यामार्फत आपले शक्तिप्रदर्शन करण्याची प्रवृत्ती वाढीस लागली आहे. याची तीन कारणे आहेत :

**अ) माध्यमांचा सर्व व्यापकपणा -**

माध्यमे देशातच नव्हे तर जगाच्या कानकोपऱ्यात कुठेही असतात. व तुमच्या मागोमाग येतातच .

**ब) माध्यमांनी परंपरांना दिलेले आव्हान** -

माध्यमांनी आपल्या साऱ्या परंपरांना जबरदस्त आव्हान दिले असून त्यांच्या अस्तित्वालाच धोका निर्माण केला आहे. विशेषत: मनोरंजनाच्या नावाखाली अनेक पारंपरिक गोष्टींची मोडतोड केली आहे. उदा रिमिक्सची गाणी.बाई बाई मनमोराचा पिसारा फुलला,हे आज सादर होणारे गाणेच आजच्या पिढीला मूळ खरे गाणे वाटते आहे.

**क) माध्यमांचे समाजविरोधी वर्तन** -

इलेक्ट्रॉनिक माध्यमांनी ; आणि एकूणच सर्व माध्यमांनी समाजविरोधी वर्तनच सुरु केले आहे.वाहिन्यांवर योग्य चित्रण येण्याऐवजी भ्रामक चित्रण केले जाते, लोकांची दिशाभूल केली जाते. देशात दुष्काळ असताना तो दाखविण्याऐवजी A.C ,फ्रीजच्या जाहीराती किंवा श्रीमंत तरुण-तरुणींच्या मुलाखती, फ़ॅशनशो दाखवून आभास निर्माण केला जातो.

माध्यमांचे हे स्वरुप व त्यांचे समाजाशी फटकून काही एका विशिष्ट वर्गासाठीचे उद्दिष्ट लक्षात घेता त्यांचे कार्य मर्यादित असल्याचेच जाणवते.त्यामुळेच त्यांची भूमिका पुढीलप्रमाणे सांगता येईल :

**माध्यमांची भूमिका**

1] मोठ्या प्रमाणावर जनसंपर्काची साधने निर्माण झाली ज्यांचा मोठा व दूरगामी परिणाम जनमानसावर झाला. *तो दुरुस्त करणे, हे पहिले काम आहे.*

2] माणसांमाणसांमधील संवाद तोडून त्यांना त्यांच्या घराच्या हॉलमध्ये t v समोर बसणारे ' जिवंत पुतळे ' असे स्वरुप प्राप्त करुन दिले.त्यांचा अवकाश मारुन टाकला.*तो जिवंत करणे, हे दुसरे काम.*

3] भ्रामक अशा वास्तवात नसलेल्या ' लोकप्रिय संस्कृती' ची निर्मिती करुन लोकांना त्यात गुंगवून टाकले. त्यांची विचारशक्तिच बंद करुन टाकली. *ती जागी करणे, हे तिसरे काम आहे.*

## माध्यमे आणि त्यांच्यातील काम व हिंसेचे प्रदर्शन

माध्यमांमधील वृत्तपत्रे,चित्रपट,रेडिओ,दूरदर्शन (वाहिन्या) व महाजाल(internet),ाशा रेडिओ व सरकारी दूरदर्शन वगळता सर्वच माध्यमप्रकारांशी संबंधित गंभीर सामाजिक आणि राजकीय स्वरुपाची नैतिक समस्या म्हणजे त्यांच्यातील 'कामप्रदर्शन व हिंसादर्शन ' (exhibition of Sex and Violence).गेल्या दशकात तर त्यांचे प्रमाण अतिरिक्त झाले आहे. विशेषत: चित्रपटांमधील कामहिंसेच्या वाढत्या प्रमाणामुळे सेन्सॉरशिपबद्दल महत्वाचे मुद्दे उपस्थित होत आहेत. सेन्सॉरमंडळाचे कामच काय , असा प्रश्न उपस्थित होत आहे.

कामप्रदर्शन व कामाशी संबंधित हिंसेंचे प्रदर्शन ही बाब विशेषत: चित्रपट व विविध वाहिन्या यांच्याशीच संबंधित आहे. वृत्तपत्रे व रेडिओ ही बहुधा या समस्येपासून दूर राहिलेली आहेत. कारण एकतर वृत्तपत्रे खासगी व प्रत्येक गावोगावची वेगवेगळी व जिल्हा व राज्य यांना सामायिक असणारी आहेत.ती घरातल्या लहानथोर प्रत्येक सदस्याच्या हाती पडणारी

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

---

असतात.रेडिओ भारतात तरी सरकारी मालकीचाच असून तोही शहरी-खेडोपाडीवाडीवस्तीवर पोहोचणारा आहे. स्वस्त आहे.आणि त्यावर काम-हिंसेचे दर्शन घडविणे कठिण आहे.त्यामुळे ही दोन माध्यमे काम-हिंसादर्शनापासून तशी लांबच आहेत.

तथापि गेल्या काही वर्षांमध्ये वृत्तपत्रही कामप्रदर्शनाला बळी पडत असल्याचे आढळते. मुख्यत: अर्धनग्न स्त्रिया असलेल्या जाहिराती व काही वेळेस पुरस्कृत पुरवण्यामंधील लेखांमध्ये हे प्रदर्शन आढळते.स्त्रियांच्या अंर्तवस्त्राच्या जाहीरातींमधूनही हे दर्शन घडते. व जाहीराती या वृत्तपत्राच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहेत, हे मान्य करुनही समस्येची उग्रता कमी होत नाही.हे प्रमाण तुलनेने कमी आहे.पण वृत्तपत्र आबलवृध्दांसाठी असल्याने समस्या गंभीर असते.



चित्रपट आणि दूरचित्रवाणी (वाहिन्या) यावरील काम-हिंसा प्रदर्शनाने कळसच गाठला आहे.सिग्मंड फ्रॉईड या मानसशास्त्रज्ञाच्या मते तर कोणतीही मानवी अथवा प्राणिज हिंसा ही नेहमीच त्या प्राण्याच्या (मानवासह) दबलेल्या कामवासनेचेच दृश्य रुप असते. माणसाची कामवासना दाबत राहिली गेली की ती त्या व्यक्तिकडून हिंसा घडवून आणते. त्यामुळे हिंसा हे या अर्थाने कामाचेच रुप होय.

फ्रॉईडचा सिध्दान्त खरा व्हावा अशा तऱ्हेनेच सध्या चित्रपट व वाहिन्यांवरील कार्यक्रमांमध्ये काम-हिंसा दिसते आहे. विशेषत: चित्रपटांमधील हे दर्शन पाहता सेन्सॉरमंडळ झोपी गेले की काय अशी शंका येते. कारण प्रत्येक चित्रपट हा त्यांच्या नियंत्रणाखालीच प्रदर्शित होतो. दुसरे म्हणजे वाहिन्यांवर अजून तरी भारतात नियंत्रण नाही. त्यामुळे गाणी , कार्यक्रम , इत्यादीमार्फत तिथेही हिंसा घडतेच आहे.

चित्रपट व वाहिन्यांप्रमाणे काम-हिंसेचे दर्शन घडविणारे आणखी एक माध्यम म्हणजे महाजाल Internet होय.इंटरनेटच्या वापराला खूपच मर्यादा आहेत.कारण एकतर तो महागडा आहे,दूरध्वनीचे कनेक्शन,इंटरनेटचे कनेक्शन इत्यादी गोष्टी महाग आहेत. अर्थात सायबरकॅफेमुळे अल्पपैशात ही सोय उपलब्ध होवू शकते.पण मोबाईलच्या स्वस्त उपलब्धतेमुळे मोबाईल पोर्नो सुध्दा सहज झाला आहे.

इंटरनेटवरील हीच महत्वाची गंभीर समस्या होय. त्यावर येणारे व उपलब्ध असणारे अश्लील साहित्य(Pornography).ही एक महत्वाची समस्या आहे. इंटरनेट सुरु करणे व एखाद्या साईटवर जाणे , हे अल्पवयीन मुलामुलींना सहज शक्य आहे.हे साहित्य एकतर सहज उपलब्ध होते किंवा email द्वारे ते तुमच्यापर्यंत येवूनच पोहोचते.त्यावर नियंत्रण आणणे कोणत्याही देशाच्या सरकारला तांत्रिकदृष्ट्या शक्य नाही.चीन इत्यादी देश इंटरनेटवर नियंत्रण आणू शकतात पण संकेतस्थळांवर नाही ! गेल्या काही वर्षात ॲन्टीपोर्न सॉफ्टवेअर्स विकसित करण्यात आली आहेत, पण ती सहजी तोडता येतील अशी !!

चित्रपटांबाबत तर किमान सेन्सॉरशिपने कडक भूमिका स्वीकारणे आवश्यक आहे.ते सरकारी बोर्ड आहे.त्यामुळे सरकारलाच ही भूमिका घ्यावी लागते. अर्थात भ्रष्टाचाराची कीड या मंडळाला सुध्दा लागलेली आहे.

या व अशा प्रकारच्या हिंसेच्या प्रदर्शनामुळे होणारा मुख्य सामाजिक तोटा असा की तरुणपिढी बरबाद होण्याच्या मार्गावर जाते. समाजात प्रेमप्रकरणात प्रेम वाढण्याऐवजी हिंसाच वाढते. महाराष्ट्रात तर अशा अनेक घटना घडल्या आहेत, घडत आहेत.

याचा दूरगामी परिणाम असा की या काम-हिंसेच्या अतिरिक्ततेमुळे व्यक्तिमधील निसर्गाचा स्थायीभा असलेला,या सृष्टीतील सृजनाचा सुंदर आविष्कार असलेली कामभावनाच विकृत होते. खरे तर फ्रॉईडच्या म्हणण्यानुसार साहित्य, संगीत , कला ,धर्म या मानवी कामभावनेचेच सुंदर व उदात्त आविष्कार आहेत. पण विकृत कामामुळे त्यात नवी सुंदर व चांगली भर पडू शकत नाही.या अर्थ चांगले संगीत , साहित्य, कला इत्यादी निर्माण होत नाही.हा मानवी समाजाचाच तोटा आहे.

## माध्यमांशी संबंधित स्वातंत्र्य व खासगीपणा

या दोन मुख्य नैतिक समस्यांचे स्वरुप आणखी वेगळे आहे.या समस्या माध्यमात काम करणारे माध्यमकर्मी पत्रकार , संपादक,तंत्रज्ञमंडळी यांच्याशी जशा निगडीत आहेत तशा त्या त्यांचा ग्राहकवर्ग असलेल्या प्रेक्षकांशीही निगडीत आहेत. पत्रकारांनी आपल्या स्वातंत्र्यासह वाचकांचे , प्रेक्षकांचे स्वातंत्र्य जपावयाचे असते. त्यांचा खासगीपणाही जपावयाचा असतो.

TITLE OF THE PAPER : PHILOSOPHY AND GOOD LIFE

Unit 6 : Media Ethics

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

---

पत्रकाराचे बातमी देण्याचे स्वातंत्र्य अबाधित असतेच पण त्याने काही नियमही पाळावयाचे असतात.माध्यमातील स्वातंत्र्य ही तात्विक तशीच व्यावहारिक संकल्पना आहे. पत्रकार किंवा माध्यमे वृत्तप्रसारणासाठी स्वतंत्र असतात.कोणते वृत्त द्यावयाचे अथवा द्यावयाचे नाही याबाबत ती स्वायत्त असतात. पण त्यांनी लोकहिताची बातमी दिलीच पाहिजे , ही त्यातील किमान अट असते. लोकहिताची बातमी द्यावयाची की नाही याचे स्वातंत्र्य माध्यमांना असले तरी त्यांनी ती न दिल्यास लोकांच्या टीकेला त्यांना तोंड द्यावे लागते.

माध्यमांना असलेले स्वातंत्र्य हे लोकशाहीत कोणत्याही व्यक्ति वा संस्थेला असलेल्या अभिव्यक्ति स्वातंत्र्याशी सुसंगतच असते.लोकशाहीत आपले मत मांडण्याचा कोणत्याही व्यक्तिला अधिकार असतो.तोच पत्रकारांनाही असतो. अर्थात पत्रकारांवर ही जबाबदारी जास्त मोठी असते. कारण तो कायद्याच्या चौकटीत व तो ज्या माध्यमात काम करीत असतो त्या माध्यमाने तयार केलेल्या नीतीनियमानुसार त्याला काम करावे लागते. म्हणजेच तो विशिष्ट जबाबदारीने काम करीत असतो. कोणतेही वृत्त देताना त्याला त्या वृत्तातील प्रत्येक शब्दाला वास्तवाचा आधार द्यावा लागतो.निराधार बदनामीकारक मजकूर त्याला प्रसिध्द करता येत नाही.

स्वातंत्र्याचा संबंध माध्यमातील खासगीपणाशीसुध्दा आहे. माध्यमे वृत्त प्रसारणास स्वतंत्र असली तरी ती स्वैराचार करु शकत नाहीत.आजची स्थिती अशी आहे की माध्यमे कोणत्याही व्यक्तिच्या खासगी जीवनात प्रवेश करु शकतात. तितके त्यांचे आर्थिक सामर्थ्य असते , त्याला प्रगत तंत्रज्ञानाची जोडही मिळते. याचे प्रसिध्द उदाहरण म्हणजे इंग्लंडच्या राजघराण्याची सून प्रिन्सेस डायना हीचे प्रेमप्रकरण. तेथील ' पापाराझी ' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पत्रकारांनी डायनाचा असा काही पिच्छा पुरविला की तिचा त्यात अपघाती मृत्यूच झाला !

याचा अर्थ असा की महत्वाची अथवा प्रसिध्दीवलय लाभलेली व्यकित ही आपले खासगी जीवन जपूच शकते,असे राहिलेले नाही.मायक्रोसॉफ्ट कंपनीचा मालक बिल गेट्स भारतात आला असता तो सकाळी उठल्यापासून झोपेपर्यंत काय काय करणार याचा सगळा तपशीलच वृत्तपत्रांनी छापला होता. हे त्याच्या खासगीपणावरील आक्रमणच होते. अशातऱ्हेने व्यक्तिचे खासगीपणच माध्यमांनी संपुष्टात आणण्याचा प्रयत्न चालविला आहे.

आणखी एक महत्वाचा मुद्दा म्हणजे बलात्कार , भ्रष्टाचार, उच्चपदस्थ किंवा लोकसेवक, समाजसेवक यांच्याबाबतीत बातम्या देताना पत्रकारास त्यांचे खासगीपण सांभाळावे लागते.त्याचप्रमाणे एखाद्या व्यक्तिने एखाद्या पत्रकारास एखादी विशिष्ट माहिती दिली की जी लोकहिताच्या विरोधात असून ती छापून येण्याने म्हणजेच ती प्रसिध्द होण्याने भ्रष्टाचार संबंधित गैरकृत्य रोखले जाण्याची शक्यता असते.अशा वेळेस अशी बातमी देणाऱ्या व्यक्तिचे नावगाव गुप्त ठेवणे , आवश्यक असते, अन्यथा त्याच्या जीवाला धोका होवू शकतो. तसे झाले तर अन्य कुणीही अशी माहिती देण्यास पुढे येणार नाहीत. गेल्या वर्षी पंतप्रधान चतुष्कोन महामार्ग योजनेतील भ्रष्टाचाराची माहिती देणाऱ्या सुरेंद्रकुमार या अभियंत्याची हत्या करण्यात आली .बलात्कारप्रकरणाबातही खासगीपणा पणे आवश्यक असते. जिच्यावर बलात्कार होतो त्या महिलेचे नाव प्रसिध्द करणे टाळणे , तिची ओळख पटेल असे न छापणे , असे नियम पाळले गेले पाहिजेत. तेंव्हा खासगीपणाचा हा अर्थ लक्षात ठेवला पाहिजे.

खासगीपणाशी संबंधित माध्यमातील आणखी एक महत्वाचा मुद्दा म्हणजे ' शोध पत्रकारिता '' होय. एखादा पत्रकार जेंव्हा एखादे रहस्य शोधून काढतो तेंव्हा तो त्या घटनेची व त्याच्याशी निगडीत लोकांचे खासगीपण शिल्लक ठेवीतच नसतो. तो त्या सगळ्या भानगडी उघडकीस आणत असतो. भाजपमधील एका केंद्रीय मंत्र्याने लाच खाल्याची बातमी तरुण तेजपाल या पत्रकाराने त्याच्या मालकीच्या वाहिनीमार्फत उघडकीस आणली.

## माध्यमाशी संबंधित वस्तुनिष्ठता व प्रामाणिकपणा

वस्तुनिष्ठता ही तत्वज्ञानाच्या भाषेत ज्ञानशास्त्रीय (Epistemological) व सत्ताशास्त्रीय (Metaphysical) बाजू आहे तर प्रामाणिकपणा हे नैतिक मूल्य आहे. या गोष्टी जेंव्हा माध्यमांशी संबंधित होतात तेंव्हा त्यांना आणखी महत्व प्राप्त होते.कारण तो सगळा संबंध केवळ लोकहिताशीच संबंधित असतो.

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

---

स्वातंत्र्य,प्रामाणिकपणा, वस्तुनिष्ठता व खासगीपणा ही नैतिक मूल्ये नेहमी लोकशाही जीवनपध्दतीतच शक्य होणारी मूल्ये आहेत. माध्यमे आणि लोकशाही यांचा संबंध याच संदर्भात प्रामुख्याने येतो. अर्थात कोणत्याही जीवनपध्दतीत प्रामाणिक राहाता येते .स्वातंत्र्य आणि खासगीपणा मात्र लोकशाहीतच शक्य असतात, त्या हूकूमशाही इत्यादी जीवनपध्दतीत व्यक्तिला दिल्याच जात नाहीत.

माध्यमांशी या गोष्टी संबंधित होतात,त्या मुख्यत : पत्रकाराने वस्तुनिष्ठ राहून प्रामाणिक राहून बातम्या देण्याचे काम करावे, ही अपेक्षेशी जोडलेल्या आहेत.एखादी घटना जशी घडेल
तसे वृत्त दिले पाहिजे. ते दडपण्यासाठी येणाऱ्या मोहांना बळी न पडता अथवा धमक्यांना न घाबरता त्याने ते वृत्त द्यावे .ही वस्तुनिष्ठा अंगी बाणणे तेंव्हाच शक्य होते ज्यावेळेस ती व्यक्ति प्रामाणिक असते. अप्रामाणिक असलेली व्यक्ति वस्तुनिष्ठ होईल, याची तार्किक शाश्वती देता येत नाही. याचा अर्थ असा की वस्तुनिष्ठता व प्रामाणिकपणा यांचा तार्किक संबंध आहे. एक गुण असेल तरच दुसरा गुण सहज प्रकट करता येतो. हाच नियम माध्यमात लागू आहे.

तथापि आपल्या हे लक्षात येईल की, आजची माध्यमे विशेषत: वृत्तपत्रे व वाहिन्या या पुर्णपणे खासगी मालकीच्या आहेत. चित्रपट हे माध्यम जरी खासगी मालकीचे असले तरी तिचा माध्यम म्हणून फारसा उपयोग कधी झालेलाच नाही.ते कायमच मनोरंजनप्रधान राहिलेले आहे. त्यामुळे ' चित्रपट माध्यमाचे पत्रकार ' असा काही प्रकार भारतातच काय पण जगातच कोठेही उदयास येवू शकलेला नाही.

माध्यमे खासगी मालकीची,त्यांचा पत्रकार व संपादक असलेला,वितरण करणारी माणसे इत्यादी सगळी खासगी नोकर तर माध्यमे जी ' बातमी ' नावाची वस्तू विकतात ती मात्र सार्वजनिक हिताची असते.हा एक विरोधाभास आहे. कारण खासगी नोकरी करुन सार्वजनिक हित सांभाळणे , ही एक कसरत आहे.

ज्या मालकाकडे पत्रकार किंवा संपादक काम करीत असतो, त्या माध्यमाचे काही एक विशिष्ट धोरण असते. आणि ते मुख्यत: पैसा मिळविणे,हेच असते . त्यामुळे माध्यमे त्यांचे आर्थिक हितसंबंध धोक्यात येतील अशा बातम्या प्रसृत करीत नाहीत. एखादी बातमी न छापता , प्रसिध्द न करता जर पैसा मिळत असेल तर ती न करणे, हेच त्यांचे धोरण बनते. अशा वेळेस मोठे कष्ट करुन ती बातमी मिळविलेल्या पत्रकारावर निराश होण्याची, वैफल्यग्रस्त होण्याचीच वेळ येते. त्याचा वस्तुनिष्ठ व प्रामाणिक राहण्याचा निश्चय डळमळू लागतो. त्यामुळे खेडोपाडी व लहान शहरातील पत्रकार किंवा बातमीदार फारसे वस्तुनिष्ठ व प्रामाणिक असतातच असे नाही, असे आढळेल.त्यांना त्यांचे हितसंबंध राखूनच बातम्या द्याव्या लागतात.त्यामुळेच तर काही पत्रकार हे स्थानिक राजकराण्यांच्या , शासकीय अधिकाऱ्यांच्या ' खास मर्जीत ' असतात.

तेंव्हा वस्तुनिष्ठता व प्रामाणिकपण ही माध्यमकर्मीकडून अपेक्षित असलेली नैतिकता आहे. पण ती डळडळीत होण्याचीच भीती असल्याने ते एक आव्हान म्हणून स्वीकारावे लागते. पत्रकाराने तसे असावे , ही आदर्शात्मक अपेक्षा (normative morality) असते खरी पण वास्तव (The Reality) वेगळेच असते.